# भिवंडी वाहतूक उपविभाग हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २६५ /२०२५ दि. २९/११/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी**, भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. २९/११/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दि.३०/११/२०२५ रोजी सकाळी ०४:०० वा. पावेतो भिवंडी निजामपुरा महानगरपालिका तर्फे **'वंजारपट्टीनाका ब्रीजवर उघडे पडलेले लोखंडी अँगल व खड्डे बुजवण्याकरीता डांबर टाकण्याचे काम'** करण्यात येणार आहे. यावेळी वंजारपट्टी नाका ब्रीज वाहतुकीकरीता पुर्णत: बंद करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** **१)** नारपोली माणकोली, रांजनोली कडुन कल्याणनाका, भिवंडी एस.टी. स्टॅंड मार्गे वंजारपट्टीनाका ब्रीजवर येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बागे फिरदोस** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व प्रकारची वाहने बागे फिरदोस येथुन वंजारपट्टी ब्रीजवर न जाता ब्रीजच्या खाली वंजारपट्टी नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **२)** नदिनाका व चाविंद्रा रोड कडुन वंजारपट्टीनाका ब्रीजवर येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **वंजारपट्टी ब्रीजच्या चढणीला 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व प्रकारची वाहने वंजारपट्टी ब्रीजवर न जाता ब्रीजच्या खाली वंजारपट्टी नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक २९/११/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दिनांक ३०/११/२०२५ रोजी सकाळी ०४:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील व सदर कामातील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा. ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.